**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन**

**भाषा मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०२ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः तुळशीदास नामदेव बैकर,

वयः ५४ वर्षे, व्यवसायः शेती,

राहणारः कांडणे, ता. रोहा, जि. रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए.एल. पवार यांच्यामार्फत :**

०१. पोलीसांनी मला पंचनाम्याकरीता बोलाविले नव्हते. अंदाजे एका वर्षापुर्वी मी तहसिल कार्यालय रोहा आलो असता पोलीसांनी माझी कागदावर सही घेतली होती. आता मला दिनांक ३१/१२/२०२२ रोजीचा पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अनुक्रमांक ०२ कडे माझी सही आहे, त्यातील मजकुराबाबत माहिती नाही.

**साक्षीदार अभियोगपक्षास समर्थन करीत नसल्याने विद्वान सरकारी अभियोक्त्यांनी त्यास उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ३१/१२/२०२२ रोजी पोलिसांनी मला व दुसरा पंच संतोष गणपत माळी याला मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन मौजे कांडणे खुर्द गावचे नाक्यावर बोलाविले होते, तेथे आम्ही दबा धरुन बसलेलो असताना रात्री ०१.०५ वा.चे सुमारास महिंद्रा पिकअप गाडी नोंदणी क्र.एम.एच.०६/बी.जी.११९८ तेथे आली, सदर गाडीचा चालक शेखर विठ्ठल

बैकर असुन सदर गाडीचे मागील हौदामध्ये उर्वरीत तीन आरोपी बसलेले होते, त्यांनी त्यांची नावे नितेश चंदर बेडेकर, लक्ष्मण पांडु पाटील व हरिश्चंद्र कृष्णा तांबडकर अशी सांगितली होती, पोलीसांनी आमचे समक्ष पिकअप गाडीची पाहणी केली असता त्यामध्ये अर्धा ब्रास वाळु, तीन फावडे व दोन प्लॅस्टीक घमेले हा मुददेमाल मिळाला होता, त्याअनुषंगाने पोलीसांनी माझे समक्ष पंचनामा तयार केला, तो मला वाचुन दाखविला व त्यानंतर त्यावर माझी सही घेतली.

०३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी शेखर बैकर याला मी ओळखतो, तो माझे भावकीतील आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याला व इतर आरोपींना वाचविण्याकरिता मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. ए.पी. दांडेकर यांनी नाकारला.**

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत.

SUNIL SAKHARAM MAHALE
Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2025.02.13 14:45:57 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दि.१३.०२.२०२५. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.